# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail – *dy.registrar.tau@fort.mu.ac.in*

**Academic Appointments & Qaulity Assurance (AAQA)**
UNIVERSITY of MUMBAI.
Fort Campus. M.G. Road. Mumbai - 32

क्र.एएक्युए/आयसीडी/२०२४–२५/२१०१ १९ मार्च, २०२५/२८ फाल्गुन, शके १९४६

**परिपत्रक:–**

विषय:– राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र शासनाची एकीकृत निवृत्तीवेतन योजना (UPS) यांपैकी कोणत्याही एका योजनेत सहभागी होण्याकरीता विकल्प सादर करण्याबाबत.

मुंबई विद्यापीठातील विविध अनुदानित विभाग/संस्थाचे संचालक/विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज. जी वास्तुशास्त्र महाविद्यालय, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र यांच्या अधिपत्याखालील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर शासन अनुदानित पदावर नियुक्त झालेल्या सर्व शिक्षकांना कळविण्यात येते की,

१) ज्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) लागू आहे अशा शिक्षकांना उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये राज्य शासनाची सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना दिनांक ०१.०३.२०२४ पासून लागू करण्यात आली आहे.

२) त्याचबरोबर केंद्र सरकारने दिनांक २४.०८.२०२४ रोजी घोषित केलेली एकीकृत निवृत्तीवेतन योजना (Unified Pension Scheme) शासकीय शिक्षकांना जशीच्या तशी लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असलेल्या शिक्षक यांना वरील दोन्ही योजनेमधील कोणत्याही एका योजनेत सहभागी होण्यास मुभा आहे.

राज्य शासनाच्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसाठी पात्र व इच्छुक असलेल्या शिक्षकांनी या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठीचा द्यावयाचा एक वेळचा (One Time Option) विकल्प दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत संबंधित कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

मात्र सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा वरीलप्रमाणे विकल्प दिलेल्या शिक्षकांस सदर विकल्पाचा फेरविचार करून ज्यांना केंद्र शासनाच्या एकीकृत निवृत्तीवेतन योजनेमध्ये सहभागी व्हावयाचे असेल तर त्यासंदर्भातील विकल्प दिनांक ३१.०३.२०२७ पर्यंत किंवा केंद्र शासनाच्या एकीकृत नवृत्तीवेतन योजना (Unified Pension Scheme) यांदर्भात निर्गमित होणाऱ्या तपशिलवार मार्गदर्शक सूचनेमध्ये विकल्पाची निवड करण्याचा नमूद दिनांक यांपैकी जो अगोदरचा दिनांक असेल तोपर्यंत फक्त एकदाच देण्याची मुभा राहील. तद्नंतर सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजर्नेतर्गत दिलेला विकल्प कोणत्याही कारणास्तव बदलला येणार नाही.

वरील दोन्ही योजनेमध्ये जे शिक्षक सहभागी होणारे नाहीत त्यांना राष्ट्रीय विनृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत निवृत्तीवेतन योजना आपोआप लागू राहील.



AAQA/Rupali/Circular

# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail – *dy.registrar.tau@fort.mu.ac.in*

**Academic Appointments & Q**
**Assurance (AAQA)**
UNIVERSITY of MUMBAI.
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32




विद्यापीठातील सर्व संबंधित शिक्षकांना कळविण्यात येते की, उपरोक्त १ व २ येथे नमूद निवृत्तीवेतन योजनेच्या अधिक माहितीकरीता संदर्भीय शासन निर्णयाचे अवलोकन करून वरीलप्रमाणे कोणत्याही एका निवृत्तीवेतन योजनेत सहभागी होण्यासाठीचा विकल्प (नमुना सोबत जोडला आहे) दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत **उपकुलसचिव, शैक्षणिक नियुक्त्या व गुणवता हमी विभाग** यांचकडे सादर करावा. जे शिक्षक विहित वेळेत विकल्प सादर करणार नाहीत त्यांना उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे भविष्यात लाभ अनुज्ञेय करण्याबाबत अडचणी निर्माण झाल्यास त्यास ते सर्वस्वी जबाबदारी राहतील याची नोंद घ्यावी.

मुंबई : ४०० ०३२
१९ मार्च, २०२५

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव